REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | MAY - 2026

# अखिल भारतीय अस्पश्य परिषद आणि दशरथ लक्ष्मण पाटील यांची भूमिका

धम्मदिना नरेश बोरकर
संशोधक विद्यार्थी

प्रो. डॉ. चंद्रशेखर संपतराव पाटील
मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना**



आंबेडकरी चळवळीचा दृष्टीने मध्य प्रांत वऱ्हाडातील दलित चळवळीचा आगळावेगळा महत्व आहे. विसाव्या शतकाचा पहिल्या दशकात महार समाजाच्या पुढाऱ्यांनी समाजात धार्मिक आणि सामाजिक सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. सन १९०६साली विठोबा रावजी मून पंडे यांनी अंत्यज समाज कमिटी ची स्थापना करून महारांच्या धार्मिक विषयाकडे लक्ष वेधले. नंतरच्या काळात महा लोकांना शिक्षण घेता यावं याकरिता विठोबा रावजी मूनपंडे यांनी महाराची परिषद एप्रिल १९१३ रोजी टाऊन हॉलमध्ये घेतली. या परिषदेच्या कार्यक्रमाची रूपरेषा देणाऱ्या पत्रकांना पहिल्या पानावर 'महार -सभा -नागपूर' यांच्या प्रीती सन्मान दिनांमहोत्सव "असे शीर्षक देण्यात आले होते.(१) या परिषदेचे सूत्रधार विठोबा मून पंडे सोबत कार्य करणारे गोमा गणेश सावरकर , करणूजी विठ्ठल माल गुजार ,दशरथ लक्ष्मण पाटील, जैरामपैकू इत्यादी पुढारी होते.

१९१३ साली महारसभे ची चौथी परिषद बेला इथे घेण्यात आली या परिषदेचे संयोजक म्हणून बेलाचे पाटील 'श्री दशरथ लक्ष्मण पाटील'यांची नेमणूक करण्यात आली. या सभेच्या माध्यमातून शिक्षण प्रसाराचे कार्य, पंचायत नियामत सुधारणा ,पिण्याच्या पाण्याची सोय, धर्मशाळा इत्यादी महत्त्वाचे उद्देश्य होते. या अहवालाच्या अनुषंगाने शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशातून सन १९२१ मध्ये श्री चोखामेळा समाजाची एक सभा दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. दशरथ लक्ष्मण पाटील यांना नंतरच्या काळात डॉ.बाबासाहेबांच्या सहवास लाभला त्यातून त्यांनी पुढे जाऊन अनेक परिषदा ,सभा यात आपले मोलाचे योगदान दिले. १९३२ चे अखिल भारतीय अस्पृश्य परिषद तसेच कामठी मध्ये झालेल्या १९३२ च्या द्वितीय दलित परिषदेत आपले मोलाची योगदान देऊन अस्पृश्य लोकांचा उन्नती करिता शैक्षणिक, आणि सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात आपली महत्त्वाची भूमिका बजावली.

**शब्द संकेत:-** महार सभा, चोखामेळा परिषद, अखिल भारतीय दलित परिषद

**अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेत दशरथ लक्ष्मण पाटील यांचे कार्य:** देशाचा इतिहासात महत्त्वपूर्ण असलेली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद सन १९३० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे घेण्यात आली होती शिवाय लंडनला होणाऱ्या पहिल्या

गोलमेज परिषदेत अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी पाठवणे तितकेच महत्त्वाचे होते. देशातील सात कोटी अस्पृश्य वर्गाचे राजकीय भवितव्य ठरविण्याचे हक्क त्यांच्या प्रतिनिधींना मिळणे आवश्यक होते. त्याकरिता अखिल भारतीय स्तरावर अस्पृश्य वर्गाचे अधिवेशन होण्याची गरज होती. मध्य प्रांत वऱ्हाड क्षेत्रातील स्थानिक पुढाऱ्यांनी ही अखिल भारतीय अस्पृश्य परिसर नागपूर ला घेण्यात यावी "याकरिता विचार विनिमय करण्यासाठी श्री दशरथ लक्ष्मण पाटील आणि लक्ष्मणराव ओगले एम .एल. सी. यांनी मुंबईला जाऊन डॉ. आंबेडकरांची भेट घेतली. त्या भेटीत अखिल भारतीय दलित परिषद डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला भरविण्याची निश्चित झाले नागपूरला ८ ऑगस्ट आणि ९ ऑगस्ट१९३० मध्ये झालेले हे अधिवेशन अस्पृश्य वर्गाचा उत्थानाचा चळवळीला व्यापक स्तरावरील व प्रतिनिधिक स्वरूपाचे पहिले अधिवेशन होय."(२) या परिषदेचे स्वागत अध्यक्ष म्हणून कालीचरणनंदागवळी यांची निवड करण्यात आली होती पण यांनी त्यावेळेस काँग्रेसचा चळवळीला पाठिंबा दिला त्यामुळे तुला राम साखरे यांना स्वागत अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. ही परिषद यशस्वी करण्याकरिता उपाध्यक्ष म्हणून दशरथ लक्ष्मण पाटील यांनी आपली मोलाची भूमिका बजावली.

७ ऑगस्ट रोजी नागपूरला झालेल्या अधिवेशनात आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भारतातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे वर्णन केले. या परिषदेतून बहिष्कृत वर्गाच्या भावी राजकीय जीवनाचा मूलभूत पाया घातला. नागपूर दलित काँग्रेस परिषदेत राजकारणाची माहिती नसलेले नवीन कार्यकर्त्यांच्या जन्म झाला. नवीन पिढीतील तरुण ण तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यांची मालिका उद्यास आली. बाबू एल. एन .हरदास, टीसी साखरे, दशरथ लक्ष्मण पाटील रेवा राम कवाडे आदी अनेक कार्यकर्त्यांनी खंबीरपणे उभे येऊन दलित जनतेला राजकीय मतभेदाचा गोंधळातून पडू न देता डॉ. आंबेडकरांच्या कुशल व खंबीर नेतृत्वाखाली संघटित करण्याच्या हेतूने त्यांच्यात वैचारिक जागृती घडवून आणण्याचे अथक प्रयत्न केले. (३)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षस्थानातून पहिले ठराव मांडले त्यानंतर वेगवेगळे ठराव या परिषदेत मांडण्यात आले. कौन्सिलात योग्य प्रतिनिधित्व मिळवा, सरकारी नोकरीत  कायद्याने तरतूद व्हावी, शिक्षण विषयक असे विविध ठराव मांडण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलित काँग्रेस परिषदचे'वर्तुळ परिषदे करिता अस्पृश्याचे एकमेव पुढारी म्हणून एकमताने निवड करण्यात आले'असे ठराव या परिषदेत मंजूर करण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हिंदुस्तानच्यास्वशासन चे प्रश्न, अस्पृश्य करिता संरक्षण, योग्य प्रतिनिधित्व, अस्पृश्य समाज आणि स्वराज, अस्पृश्य वर्गाचे संघटन अशा जीवनाशी निगडित असलेल्या अत्यंत गंभीर प्रश्नावर बाबासाहेबांनी योग्य मार्गदर्शन केले. ह्या परिषदे बरोबर सामाजिक परिषद, महिला परिषद ,युवा परिषद व शिक्षणा विषयक परिषद घेण्यात आल्या. सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून पा.ना. राजभोज यांची निवड करण्यात आली तसेच  स्वागत कमिटी चे उपाध्यक्ष म्हणून दशरथ पाटील यांनी दलित काँग्रेस अधिवेशनाची धुरा सांभाळले आणि अस्पृश्यांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या संघटित प्रयत्न केला.

## अखिल भारतीय दलित परिषद (१९३२)

ऑल इंडिया डिफरेन्स क्लासचे दुसरी परिषद कामठी ला व्हावी म्हणून बाबू एल एन हरदास यांनी एक सभा आयोजित केली. या परिषदेत सर्व स्तरावरील दलित पुढाऱ्यांना एका पत्रकाद्वारे निमंत्रित करण्यात आले."त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार अखिल भारतीय दलित परिषद बोलवण्याच्या मुख्य हेतू होता'(१) वर्तुळ परिषदेत सादर करण्यात आलेल्या अल्पसंख्याकांच्या करारनाम्याच्या विचार करणे. (२) अस्पृश्य समाजाची अखिल भारतीय स्तरावर मध्यवर्ती संघटना स्थापन करणे. या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची होती या परिषदेत डॉ. आंबेडकर व रावबहादुर आर श्रीनिवासन हे अल्पसंख्याकांच्या वर्तुळ परिषदेतील करारनाम्यासंबंधी सविस्तर निवेदन करणार होते." (५)

७ मे ला डॉ. बाबासाहेब  आंबेडकरांचे मुंबईवरून नागपूरला आगमन झाले. फार मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या अस्पृश्य स्त्री-पुरुषांनी डॉ. आंबेडकरांच्या जयघोषाने वातावरण ढवळून गेले. अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनासाठी देशातील वेगवेगळ्या भागातून दलित समाजाचे अनेक नेते आणि संघटनेच्या वतीने २०० तारां च्या वर आणि शुभ पत्र पाठविण्यात आले होते. या अधिवेशनात अनेक प्रस्ताव मांडण्यात आले त्यामध्ये अल्पसंख्याकांच्या करारातील अस्पृश्य वर्गांच्या मागण्या, अस्पृश्य वर्गीयांचे संरक्षण,

त्यांच्या संरक्षण करिता त्यांच्या आवश्यक अशी नैसर्गिक हक्काची मागणी तसेच"ठराव ७:-भारतीय वर्तुळ परिषद मध्ये अस्पृश्य वर्गाला योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले नाही, याबद्दल ही परिषद आपला तीव्र विरोध जाहीर करते आणि देशात अस्पृश्य वर्गाच्या न्याय हक्काच्या मागणीला होत असलेल्या तीव्र स्वरूपांच्या विरोध लक्षात घेता ही परिषद ब्रिटिश सरकारला आग्रहाची मागणी करते की, वर्तुळ परिषदेत त्यांना आणखी जास्त प्रतिनिधित्व देण्यात यावे."(६)

या प्रस्तावाला मध्य प्रांत व्हाडातील अस्पृश्य समाजाचे नेता दशरथ लक्ष्मण पाटील यांनी अनुमोदन केले.

१९३२ मध्ये झालेल्या या परिषदेत उपस्थित भारतातील अस्पृश्य प्रतिनिधींनी एकमताने डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाच्या उद्घघोष केला. या अधिवेशनात सर्व प्रतिनिधींची बैठक होऊन'ऑल इंडिया डिप्रेशन क्लास फेडरेशन'या नावाने नवीन संस्था स्थापन करण्यात आली. फेडरेशनच्या प्रातिनिधिक कमिटी वर मध्य प्रांत विभागातून दशरथ लक्ष्मण पाटील यांची निवड करण्यात आली. या अधिवेशनाला यशस्वी पार पाडण्या करिता दशरथ ल.पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजक बाबू एल. एन. हरदास यांना आर्थिक मदत करून कार्यक्रमाला यशस्वी केला. १९३२ ला अखिल भारतीय दलित काँग्रेसचे अधिवेशन पार पाडल्यानंतर निरनिराळ्या प्रांतात दलित परिषदा घेण्यात आले. या परिषदेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाचा संपूर्ण पाठिंबा डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाला असल्याचे जाहीर करण्यात आले.

**उपसहार :**

भारतीय अस्पृश्य परिषदेने नागपूर आणि कामठी परिसरात दलित समाजाचा राजकीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचे असे पाऊल टाकले. नागपूरला झालेल्या अस्पृश्य परिषदेत डॉ. बाबासाहेबांनी संघटित संस्था स्थापन करण्याची निकड केली आणि द्वितीय परिषदेत अस्पृश्यांच्या प्रश्नांना संघटितपणे पाठबळ मिळावे आणि प्रभावी नेतृत्वाखाली राजकीय हक्काची चळवळ चालविता यावी याकरिता एक सुसंघटित संस्थेची स्थापना करण्यात आली.

**संदर्भसूची:**


1. पाटील विकास"आमच्या चार पिढ्यांची समाजसेवा"प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन, प्रथम आवृत्ती मार्च२०१७, पृष्ठ क्रमांक २४
2. कोसारे एच .एल."विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास"ज्ञानदीप प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९८४, पृ. क्र.१६०
3. कित्ता पृष्ठ क्रमांक १८७
4. कित्ता पृष्ठ क्रमांक १६१
5. थुल आशिष"जय भीम चे प्रवर्तक बाबू हरदास एल .एन."प्रज्ञासूत्र प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०२१ पृ. क्र. ५२
6. कोसारे एच .एल."विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास"ज्ञानदीप प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती १९८४ प्र. क्र.२०५,२०६